
UGC CARE Listed Journal
ISSN 2231 - 573X

वर्ष १० वे
अंक - ४ था (जानेवारी ते मार्च - २०२०)

साहित्य, कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक

# तिफण

भाग - १



संपादक
डॉ. शिवाजी हुसे
मराठी विभाग प्रमुख,
शिवाजी महाविद्यालय, कन्नड, जि. औरंगाबाद.

वर्ष - १० वे - अंक - चौथा - जानेवारी ते मार्च - २०२०
तिफण - ISSN 2231 - 573X

# अनुक्रमांक (भाग - १)



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | मध्ययुगीन मराठी साहित्याचे अध्ययन-अध्यापन :एक दृष्टीक्षेप<br>**डॉ. राजाराम अं. झोडगे** | १-३ |
| २ | संत साहित्याचे अध्ययन,अध्यापन...आजच्या संदर्भात<br>**डॉ. रामा रोकडे** | ४-१० |
| ३ | संत साहित्याचे अध्यापन<br>**प्रा. रमेश बलभीम जाधवर** | ११-१४ |
| ४ | संत साहित्याचे अध्ययन आणि संशोधन<br>**प्रा. डॉ. दत्तात्रय प्र. डुंबरे** | १५-२१ |
| ५ | संत साहित्यांचे अध्यायन, अध्यापन आणि संशोधन<br>**प्रा. डॉ. बालासाहेब कोंडीबा जाधव** | २२-२५ |
| ६ | संत साहित्याचे अध्ययन, अध्यापन आणि संशोधन<br>**डॉ. मिलिंद नामदेवराव भिलपवार** | २६-२८ |
| ७ | संत साहित्याचे अध्ययन, अध्यापन आणि संशोधन<br>**प्रा. पसरकले समाधान** | २९-३२ |
| ८ | संत साहित्याचे अध्ययन, अध्यापन आणि संशोधन<br>**प्रा. डॉ. जगतवाड शिवाजी पिराजी** | ३३-३५ |
| ९ | संत साहित्याचे अध्ययन आणि अध्यापन<br>**डॉ. एम. ए. कव्हळे** | ३६-४० |
| १० | मध्ययुगीन संत वाङमयातील सौंदर्यविषयक दृष्टिकोन<br>**डॉ. सिद्धार्थ आगळे** | ४१-४४ |
| ११ | संत तुकारामांच्या अभंगांचे अध्ययन, अध्यापन आणि संशोधन<br>**डॉ. राखी सिद्राम सलगर** | ४५-४७ |
| १२ | प्राचीन मध्ययुगीन साहित्याचे अध्ययन व अध्यापन<br>**प्रा. डॉ. अनिल बळीराम बांगर** | ४८-५३ |

# १२. प्राचीन - मध्ययुगीन साहित्याचे अध्ययन व अध्यापन

प्रा. डॉ. अनिल बळीराम बांगर
मराठी विभाग प्रमुख, को. ए. सो. लक्ष्मी- शालिनी महिला महाविद्यालय, पेझारी, ता. अलिबाग, जि. रायगड.

**प्रस्तावीक**

प्राचीन — मध्ययुगीन वाङ्मयाच्या अध्यन — अध्यापनाच्या संदर्भात उद्दिष्टाच्या प्रश्नाांचा विचार काळजीपूर्वक करावा लागतो. धर्मरक्षण व धर्मप्रसार हीच मध्ययुगातल्या मराठी वाङ्मयाची प्रधान प्रेरणा होती असे जरी असले तरी कोणत्याही कालखंडातील वाङमयाचे अध्ययन व अध्यापन हे केवळ वाङ्मयसौंदर्यासाठीच केले गेले पाहिजे हया विषयी सहसा दुमत होऊ नये असे वाटते. वाङमयाचे आकलन — आस्वाद — मूल्यांकन ही सारी सौंदर्यशोधनाच्या संदर्भात व्हावयास हवी ज्ञानेश्वरीच्या लेखनास ज्ञानेश्वर अनेक हेतूनी प्रवृत्त झाले आणि ज्ञानेश्वरीने अनेकविध सामाजिक व धार्मिक कार्ये साधली असे दाखवून दिले जाते हे खरे असले तरी वाङ्मयाच्या अध्ययन व अध्यापनाच्या संदर्भात जेव्हा आपण ज्ञानेश्वरीकडे पाहतो तेव्हा तिच्यातील सौंदर्याचेशोधन हेच आपले उद्दिष्ट असले पाहिजे. ज्ञानेश्वरीकडे ज्याप्रमाणे विदग्ध रसवृत्तीने समर्थपणे पाहिले जाऊ शकते. त्याप्रमाणे आशय अभिव्यक्तीच्या ऐक्याच्या दृष्टीनेही तिच्यातील सौंदर्यावर प्रकाश पडू शकतो. मात्र प्राचीन मराठी वाङमयाच्या अध्ययन व अध्यापनात असले अभ्यासच खऱ्या अर्थाने अप्रस्तुत ठरतात. प्राचीन लेखक कवीच्या सामाजिक — धार्मिक कार्यासंबंधीचे अभ्यास अप्रस्तुत ठरावेत असे वाटते.

वाङमयाचे अध्ययन व अध्यापन प्राचीन — मध्ययुगीन वाङ्मयाचे असो सौंदर्याच्या आस्वादासाठीच व्हावयास हवे. हयादृष्टीने महाविद्यालयीन स्तरावरील मराठी वाङ्मयाच्या अभ्यासक्रमाकडे पाहणे उचित ठरेल. वरिष्ठ महाविद्यालयीन पातळीवरील मराठी वाङमयाच्या विशेष विद्यार्थ्यांनी प्राचीन — मध्ययुगीन साहित्याचा अभ्यास कोणत्या हेतूने करावा. त्यातून त्यांची कोणती क्षमता सिध्द व्हावी हे निराळे सांगण्याची आवश्यकता नाही. खरेतर वाङ्मयीन संवेदनशीलता जितीजागती ठेवता येणे हे एक प्राचीन वाङमयाच्या अध्ययन अध्यापनातले फार मोठे आव्हान आहे. परिचित शब्दार्थ, तत्कालीन सांस्कृतिक परिस्थितीची पार्श्वभूमी इत्यादींना समजून उमजून बाजूस सारण्याचे सामर्थ्य अभ्यास व अध्यापकाच्या ठायी यावे लागते. महाविद्यालयीन पातळीवरील विद्यार्थ्याला विशेषत: प्राध्यपकाला प्राचीन वाङ्मयाचे विशुध्द सौंदर्यस्वाददृष्टीने आकलन — विश्लेषण करता आले पाहिजे. प्रा. वा.ल. कुलकर्णी यांचे ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम, मोरोपंत, हयांच्यासंबंधीचे लेखन म्हणजे विशुध्द व नेटक्या सौंदर्यास्वाददृष्टीने केलेले प्राचीन वाङ्मयाचे आस्वादनपर असे उत्तम लेखन आहे. प्राचीन वाङ्मयाच्या उच्च पातळीवरील अध्ययन व अध्यापनातला ते लेखन म्हणजे आदर्श वस्तुपाठच आहे असे गो.ग. कुलकर्णी म्हणतात.

प्राचीन मराठी वाङ्मयाचे आपले उच्च शिक्षण मात्र सौंदर्यस्वादाला गौण मानून सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक दृष्टीकोनातून चाललेले दिसते याचे कारण सौंदर्य, त्याचे आस्वादन व मूल्यांकन या संबंधीच्या

सदोष व चुकीच्या संकल्पना स्थिरपद झालेल्या आहेत त्यामुळे पंथीय व पारमार्थिक प्रेरणा प्रवृत्तीतून निर्माण झालेल्या मध्ययुगीन वाङ्मयाचे 'वाङ्मयीन' दृष्टीकोनातून अध्ययन करणे अनुचित व अवघड वाटू लागते त्यामुळेच वाङ्मयाचे 'पंथनिष्ठ' इतिहासलेखन करणे हे समावेशक धोरण ठरवून तडजोडीचा मार्ग काढला जातो. त्यामुळेच, 'पुष्कळदा भाषा परिपुष्ट कशी होत गेली हे दाखविण्यासाठी वाङ्मयाच्या इतिहासात ललितेतर ग्रंथाचा विचार करणे भाग अगते' असे मत प्रतिपादन केले जाते. प्राचीन मराठी वाङ्मयाचे अध्ययन व अध्यापन हे खरे तर त्यातील सौंदर्यासाठीच करायचे उद्दिष्ट आपण सतत डोळ्यापुढे ठेवले पाहिजे.

प्राचीन मराठी वाङ्मय हे प्राधान्याने सांप्रदायिक वाङ्मय आहे. नाथ, भागवत, महानुभाव, दत्त व समर्थ ह्या संप्रदायाची अभ्यासकानी तपशीलवार नोंद घेतलेली आहे. प्रत्येक पंथाचे तत्वज्ञान व आचारधर्म वेगवेगळे आहेत त्याच्या प्रसारासाठी आणि प्रचारासाठी प्रामुख्याने त्या त्या पंथीयांनी वाङ्मयीनिर्मिती केलेली आहे म्हणून निरनिराळया पंथाचे तत्वज्ञान आणि आचारधर्म विशद करून सांगणारे ग्रंथ अभ्यासकांनी सिध्द केलेले आहेत. आणि त्यांच्या प्रकाशात त्या त्या वाङ्मयाचे झालेले अभ्यास पुढे मांडण्यात आलेले आहेत. म्हणजे समग्र प्राचीन मराठी वाङ्मयाचे सध्या उपलब्ध असलेले अभ्यास हे पंथीय तत्वज्ञान व आचारधर्म यांना आधारभूत धरून झालेले आहेत.

पंथीय तत्वज्ञान व आचारधर्म यांच्या संशोधनाची दृष्टी ही तत्वज्ञानात्मक व धार्मिक दृष्टी होय. तिला वाङ्मयीन कला सौंदर्यशोधनाची दृष्टी असे म्हणता येणार नाही म्हणून पंथीय तत्वज्ञान आचार, गुरू परंपरा, उपासनामार्ग यासंबंधीचे अभ्यास आपल्याला तत्कालीन धर्मविषयक जाणिवा याची माहिती देतात, परंतु ते तत्कालीन वाङ्मयातील सौंदर्यावर कसलाही प्रकाश टाकत नाहीत वास्तविक प्राचीन मराठी वाङ्मयाला जे वैशिष्टयपूर्ण रूप प्राप्त झाले आहे ते त्याच्या पाठीमागील विशिष्ट पंथीय भूमिकेमध्ये. जे सौंदर्य आपणास प्राचीन वाङ्मयात आढळते ते फलद्रूप होण्यात पंथीय तत्वज्ञानाचा हातभार लागलेला असतो.

वाङ्मयेतिहासाचे अध्यापन हे एक आव्हान आहे. अध्यापकाला सतत सतर्क रहावे लागते. वाङ्मयेतिहासाच्या उपयुक्ततेबद्दल उल्हास असेल तर अध्यापनात मन:पूर्वकता येते. या वाङ्मयेतिहासात 'काही नाही' यापेक्षा 'काय आहे' यावर अध्यापकाचा कटाक्ष हवा. म्हणजे पूर्ततेच्या विचाराने अध्यापन होईल. मराठी साहित्याच्या इतिहासकारांनी मध्ययुगीन साहित्य आणि अर्वाचीन साहित्य अशा दोन संज्ञा १९४५ पूर्वीच्या साहित्याच्या संदर्भात वापरलेल्या आहेत.

मध्ययुगीन : मध्ययुगीन साहित्य म्हणजे महानुभाव पंथाचे साहित्य, महानुभव पंथाचे साहित्य, ज्ञानेश्वरांपासून तुकाराम, रामदासांपर्यंतच्या संतांचे साहित्य, मुक्तेश्वरांपासून मोरोपंतांपर्यंत पंडित कवींचे साहित्य आणि रामजोशींपासून प्रभाकर, होनाजी बाळापर्यंतच्या शाहिरांचे साहित्य होय. अकराव्या शतकापासून अठराव्या शतकापर्यंतच्या काळातील साहित्याचा यात समावेश होतो.

यामध्ये गद्य व पद्य स्वरूपाचे साहित्य आढळते. गद्यामध्ये संस्कृत व मराठीत लेखन झाले. मराठी गद्यामध्ये अनेक विषयांचे लेखन झाले असले तरी वाङ्मयीन महत्व लाभलेले वाङ्मय पुढीलप्रमाणे

१. पंथीय अवतारी पुरूषांची चरित्रे, लीळाचरित्र, स्मृतिस्थळ, गोविंदप्रभू चरित्र इ. यांतून निर्माण झालेले सूत्रपाठ, दृष्टान्तपाठातील ग्रंथ, पूजावसर इ.

२. पंडिती वळणाची टीका भाष्यपर ग्रंथरचना केली ती पुढीलप्रमाणे –

अ) सूत्रपाठ, भाष्य, महाभाष्य, लापाणिका, साहित्यशास्त्र, व्याकरण, तर्क न्यायशास्त्र इ.

आ) टीप व भाष्य ग्रंथ : 'सूत्रां' नर स्थळ, बंध हेतुस्थळ इ. गद्य भाष्ये.

इ) 'लक्ष्मण रत्नाकर' वरील 'बत्तीस लक्षणी टीप' ग्रंथ, तसेच 'पंचवार्शिक', 'बालबोधिनी' इ. ग्रंथ.

ई) स्थळ ग्रंथाची मूळ सूत्र, लापिका, आचार, वचन, संबंध आणि आचारलापिका स्थळ अशा पाच प्रकारात रचना.

महानुभाव साहित्याचे वाङमयीन आणि पंथीय स्वरूप समजून घेण्यासाठी या ग्रंथाना मोठे संदर्भमूल्य आहे. तसेच पूर्वपरंपरा नसलेला अशा तऱ्हेचा वाङ्मयप्रकार मराठीमध्ये प्रथमच साकार होत होता. लीलाचरित्राचा घाट हा कथा, कहाणी, लोकवार्ता या स्वरूपाचा होता. महानुभाव चारित्रातील स्मृती चारित्रनायकाच्याच व्यक्तित्वाभोवती फिरणाऱ्या आहेत. यांचे अध्यापन करताना मूळ पुरूषाचे यथार्थ रूपदर्शन, लेखनात इतिहासकराची तटस्थता न रहाणे समकालीन समाजेतिहासाचे दर्शन यांचा प्रामुख्याने विचार करावा लागतो. स्मृतीतील धार्मिक सामाजिक, राजकीय घटनांचे संदर्भ, निवेदनशैलीतील तटस्थता, ग्रंथला लाभलेले पावित्र्य व प्रामाण्य यांचे विवेचन अध्यापनात होणे आवश्यक आहे.

यादवकाळा नंतर सुमारे साडेतीनशे वर्षानंतर बखर साहित्याच्या रूपाने मराठी गद्याचा नवा आविष्कार आढळतो. लेखनाला शास्त्रपध्दती नसल्याने लिखित, ज्ञात, ऐकीव अशा सर्व साधनसामग्रीचा आधार घेऊन त्यांचे लेखन झाले आहे. आश्रयदात्याविषयीच्या कृतज्ञतेमुळे काही घटनातून दैवी वलये निर्माण होतात. थोर पुरूषांचे चरित्र वाचणाऱ्यास धनधान्याप्रमाणेच संततीही प्राप्त होईल अशी फलश्रुती सांगितली जाते. याचे मूल्यमापन करताना त्यांच्या भावनिक परिणामाकडे व भाषिक आविष्काराकडे अधिक लक्ष पुरविणे आवश्यक आहे. वाक्प्रचार, म्हणी यांचा केलेला वापर, कादंबरीप्रमाणे आलेली रंजकता इ. चे विवेचन अध्यापनातून व्हावे.

पत्रात्मक गद्याला ऐतिहासिक व वाङ्मयीन महत्वही आहे. ही पत्रे म्हणजेच महाराष्ट्राच्या इतिहासाला थोरांची छोटी छोटी आत्मचरित्रे आहेत. या पत्रातून मनातील राग, लोभ, क्वचित मत्सर, स्वार्थ व्यक्त झाला आहे. भावनेचा उत्कट आविष्कार झाला आहे. व्यावहारिक बोली भाषेतील जोरदारपणा, प्रांजलपणा त्यात उतरला आहे. प्रवाहीपण लाभले आहे. कथनात्मक पत्रलेखन पत्रलेखन पध्दतीमुळे स्वागतात्मक, नाट्यछटात्मक स्वरूप प्राप्त झाले आहे. तत्कालीन राजकीय, सामाजिक जीवनाचे विविध पैलू याद्वारे उघड होतात. अंत:करणातील भावनांना लगेच शब्दरूप मिळत गेल्यास त्यात जिवंतपणा आलेला आहे. मोडी लिपीतून हा मनाचा बालबोधपणाचा व्यक्त झाला आहे. मध्ययुगीन गद्याचा हा वैभवशाली वारसा, साहित्याची श्रीमंती, यादृष्टीने या अभ्यासास नव्या पिढीने प्रवृत्त होणे यासाठी अध्यापनातून विशेष प्रयत्न करणे आवश्यक आहे.

मध्ययुगीने मराठी साहित्यात पद्य वाङ्मय विपुल प्रमाणात आढळते. ज्ञानेश्वर आणि इतर संतांचे अभंग शिकविताना सामाजिकतेपेक्षाही निश्वप्रत्ययक्षमता महत्वाची ठरते. कारण माणसाच्या जीवनजगण्याची बाह्य बाजू म्हणजे सामाजिकता असते. परंतु मानवी सुखदु:खात्मक अनुभवांचे, भावविचारांचे जे प्रभावी अंतरंग असते, ते अंतरंग वैश्विक प्रत्ययकारी ठरते. अखेरपक्षी हे साहित्य म्हणजे माणसाच्या वृत्तीप्रवृत्तींचे, सुखदु:खांचे संघर्षाचे चित्रण असते. मानसाच्या सामाजिकतेच्या बाह्य कवचाखाली भावभवचना, अनुभव, कलह

— झगड्यांचे जे आंतररूप असते, ते वैश्विक असते. हेच साहित्यातील सामाजिकतेचे वैश्विकरूप असते. हे सार्वत्रिक असते.

मध्ययुगीन काळात मुद्रणकला अस्तित्वात नसल्याने पाठांतरसुलभतेच्या दृष्टीने वाङ्मय हे पद्यस्वरूपी आहे. एकादशस्कंध एकनाथ, यथार्थदीपिका — वामनपंडित, दासबोध — रामदास हे वैचारिक लेखन पद्यस्वरूपी आहे. भावार्थरामायण, आर्याभारत, रूक्मिणिस्वयंवर हे कथात्मक आणि तीर्थावळी, समाधी हे चरित्रात्मक वाङ्मयही पद्यस्वरूपात आहे. कीर्तन, प्रवचन, भजन, तमाशा ही त्यावेळची प्रसारमाध्यमे होती. ती पद्याला अनुकुल होती. काळाला अनुरूप असा हा स्वीकार होता. कोणत्याही प्रकारचे वाङ्मय समाजासमोर येण्यासाठी पद्यमय रचना त्याकाळी योग्य होती. म्हणून कीर्तनासारख्या माध्यमातून मुक्तेश्वर, श्रीधर, एकनाथ, मोरपंत यांना प्रतिष्ठा प्राप्त झालेली दिसते. कीर्तन — प्रवचनकारांनी या लेखकांना समाजापर्यंत पोहोचविले आणि या लेखकांनी कीर्तनप्रवचनकारांना विषय दिले. असे हे एकमेकांना पूरक ठरले. काळाच्या पार्श्वभूमीवर स्वरूपाचा विचार अध्यापनात होणे गरजेचे आहे.

विद्यार्थ्यांच्या आकलन सुलभतेसाठी कथावस्तू प्रथत अध्यापनातून निवेदित करावी. श्रोत्याला परिचित अशा रामायण — महाभारत — भागवत या कथानकावर रचलेले काव्य हे त्यांनी रोचक व रंजक केले याची कारणमीमांसा करावी. सर्वच पंडिती काव्य हे महाकाव्यावर का आधारित आहे, त्यांनी स्वतंत्र कथावस्तू का निवडल्या नाहीत हे तत्कालिन वाङ्गयपरंपरेच्या संदर्भात विशद करतान समाजाच्या लोकमान्यतेचा निकष लावावा. देवादिकांचा पराक्रम कथन करतान त्याला मानवी पातळीवरचे रंग जे आपोआपच प्राप्त होतात ज्यामुळे सामान्य माणूस ते आवडीने ऐकतो. भक्तीरसाचे शिंपण हा याचा प्रधान हेतू आहे. देवालयाच्या परिसरात ही आख्याने सांगितली जात असल्याने देवतांचे पराक्रम त्यात ओघानेच आले आहेत. श्रीधराने शिवलीलातृत, मोरोपंतांची सुदामचरित्र, प्रल्हादचरित्र यातून सामान्यांच्या मनातील भक्ती जागवून त्यांना नैतिक वर्तणुकीचे पाठ देणे हे त्या काळात अनुसरून कसे होते हे अध्यापकाने सांगावे आज ज्या अत्याधुनिक वातावरणामध्ये विद्यर्थी जीवन जगत आहे, त्या विद्यार्थ्याला हे काव्य कसे रोचक वाटेल याचाही विचार अध्यापनात महत्वाचा ठरतो.

संकेताचे पालन करूनही पुन्हा हे साहित्य लेखकाची स्वतंत्र प्रतिभा कशी दाखवून देते आणि श्रोत्यांच्या भक्तीच्या व पापविमोचनाच्या अपेक्षा कशा पूर्ण करते याबरोबरच विविध प्रकारची आलंकारिक रचना, चित्रकाव्यादी प्रकार, पदे, कटाव, आर्या, श्लोक, चूर्णिका, ओवी अशा आविष्काररूपात ते कसे प्रकटते याआधारे वाङमयीनी रसग्रहण करणेही आवश्यक आहे.

एकदा वाङ्मयीन रसवत्ता विद्यार्थ्यांकडे आली की मग कथेमधील निवेदनशैली, कथेमधील घटनांची मांडणी, कथेमधील पात्रांच्या परिचयाची पध्दती, नायक नायिका, प्रतिनायक — प्रतिनायिका, खलनायक — खलनायिका, संघर्षात्मक प्रमुख प्रसंग, कथतील वातावरण, कथानिवेदकाचे व्यक्तिमत्व या सर्वांमधून हा कथासदृश वाङ्मयप्रकार सुस्पष्ट करता येतो. शाश्वत निकष लावून निवेदनशैलीचे मूल्यमापन करणे आवश्यक आहे. शब्दसिध्दी, अर्थप्रक्रिया, म्हणी, वाक्प्रचार इ. विचारही व्हावा. वाङ्मयीन मूल्य मध्यवर्ती ठेवून अध्यापनाची चौकट ठरवावी. त्या अनुषंगाने सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, नैतिक तपशील विद्यार्थ्यांना पुरवावा.

स्वराज्याबरोबर उदय पावले ते शाहिरी वाङ्मय. ऐहिक भरभराटीबरोबर शाहिरी काव्याची भरभराट झाली व नंतर कवितेला जीवनरस पुरविणारे सत्व नाहीसे झाल्याने अस्तंगतही झाले. पोवाडे व लावण्या या दोन रूपात प्रकट झालेले हे सभोवतालच्या वातावरणातून फुलले. राजाश्रय व लोकाश्रयावर हे जगले. वीररस व शृंगाररसप्रधान काव्य ही तत्कालीन अभिरूचीची मागणी होती. दृश्य व श्रवणता ही तिची वैशिष्ट्ये. शृंगारिकतेवर, समाजस्थितीपर, भेदिक लावण्या असे रचनाप्रकार हाताळले. लावणीतील अध्यात्म जे भेदिक लावणीतून जाणवते त्याची तुलना संतकाव्याशी होईल का हा विचार अध्यापकाने चर्चेतून समोर आणावा. राजकीय, सामाजिक परिस्थिती संदर्भात अलंकारमूल्य, प्रतिमासृष्टी, शब्दसौष्ठव, नादमयता, अभिनयमूल्य, श्रुतिसुभगता या काव्यांगाच्या आधारे सौंदर्य उलगडून दाखवावे.

अस्सल देशीयतेमुळे साहित्यकृतीला समाजाच्या अस्सल काळ्या मातीचा स्पर्श होतो. विशुध्द सामाजिकता त्यात येते. आधुनिकपूर्व साहित्याचा विचार या दृष्टीने करणे आवश्यक आहे. या साहित्यातील सामाजिक चित्रणामागे जी भूमिका होती त्याचा संदर्भ ऐहिक नसून पारमार्थिक स्वरूपाचा कसा होता तो भाग अध्यापनात महत्वपूर्ण ठरावा. मराठी संतसाहित्यात परमार्थप्राप्तीच्या ध्येयासाठी म्हणून स्वीकारलेली समतेची, न्यायाची नि व्यक्तीच्या प्रतिष्ठेची भूमिका होती. ज्ञानेश्वरादी संत हे परमार्थिक ध्येयवादासाठी अवतरले व जगले हे खरे; पण समाजासाठी जी अक्षररचना त्यांनी उभी केली ती श्रेष्ठ प्रतिभेचीच निदर्शक कशी ठरते हाही अध्यापनाचा भाग ठरावा. आपले सांस्कृतिक संचित अभ्यासक्रमाच्या माध्यमातून पोहोचविताना शिक्षकाला विद्यार्थ्यांवर चिरंतन मूल्यांचे संस्कार करता येतात.

संतांची भक्तीसरिता व शाहिरांची वीरशृंगारपर रचना आणि लोकगीते, लोकथांची मौखिक परंपरा यांनी आपली ग्रामीण वाङ्मयीन परंपरा अजूनही भारलेली आहे. संतशाहिरांच्या वाङ्मयीन संस्कारामुळेच आधुनिक साहित्याची अभिरूची या समाजात रूजत आहे व रूजेल एवढी शब्दांचे व भाषेचे रसिकावलोकन करण्याची क्षमता ग्रामीण वाङ्मयीन संस्कृतीत आहे. वाङमयाचे हे सामर्थ्य अध्यापकाने स्पष्ट करावे. भाषा नि त्यातून शिल्पित झालेले जीवनार्थाचे घाट हे वाङमयाचे स्वरूप, समाजातील भेदांना व वैषम्याला फारशी दाद न देता एकविधतेकडेच लक्ष ठेवून कसे असते हा व्यापक विचार अध्यापनातून प्रकर्षाने व्हावा. संतसाहित्याचा इतिहास हा कालानुक्रमे घडणाऱ्या वाङ्मयीन घटनांच्या वस्तुस्थितीवर व क्रमावर भर देतो. ऐतिहासिक नोंद हा या ठिकाणी प्रभावी घटक असतो. संतसाहित्याच्या परंपरेत त्या वस्तुस्थितीमागील प्रेरक तत्वे वा प्रणाली व त्यांच्या वाङ्मयीननिर्मितीवर झालेला अंतर्बाह्य परिणाम यावर भर असतो. वाङ्मयीन ऐतिहासिक विवेक हा प्रभावी घटक असतो. प्रकृती, प्रयोजन, साध्यसाधने यासंदर्भात अध्यापनातून सुस्पष्टता यावी.

महाराष्ट्रात नाथ, वारकरी, दत्त, रामदासी, महानुभाव असे काही धार्मिक पंथ उदयास आले आणि त्यांच्या आचार – विचारप्रणालीनुसार साहित्यनिर्मितीने संप्रदाय निर्माण झाले. संप्रदाय हा शब्द धार्मिक पंथांच्या बाबतीत विशेषकरून वापरण्याची प्रथा आहे. श्रध्दा व पोथीप्रामाण्य हे जे या संकल्पनेचे घटक असतात ते त्या साहित्तविचारातून दिसून येतात. ही पोथीनिष्ठता असूनही ज्ञानेश्वर, तुकाराम, रामदासांच्या साहित्यनिर्मितीतून जी विशाल जीवनार्थाची प्रचीती येते ती अध्यापनातून प्रतीत व्हावी.

संप्रदाय हे सिध्दस्वरूपातच असतात. ते मूलतः स्थिर असतात. परंपरा ही समाजाच्या स्थितीगतीतून सतत संस्कारित होत असते. तिच्यातील नवनवोन्मेषशीलता शोधून मान्य केल्यावर परंपरेची चैतन्यशीलता व संप्रदायाची जडता विद्यार्थ्यांच्या लक्षात आणून दिली पाहिजे.

महानुभाव व भक्तीमार्गी संप्रदायाने धर्मक्षेत्रातील प्रस्थापितांना जो विरोध केला त्या अर्थाने सामाजिक व सांस्कृतिक संदर्भात हे साहित्यही विद्रोही ठरते का या दृष्टीने विद्यार्थ्यांना चिंतनशील करणे आवश्यक आहे. संतसाहित्य, पंडिती साहित्य, शाहिरी वाङ्मय यांचा मराठी साहित्याची समग्र परंपरा म्हणून परामर्श घेताना या परपरेतील अंगभूत परिवर्तनाची प्रक्रियाही लक्षात घ्यावी. पंडिती परंपरा ही एका अर्थाने असामाजिक अशा वाङ्मयीन आदर्शांच्या अनुकरणातून प्राधान्याने निर्माण झाली. तर बहुजनांचे रंजन हे शाहिरी काव्याचे प्रयोजन होते व सामाजिक रंजनाचा प्रायेगिक प्रयोग त्यांनी कसा केला हे वाङ्मय प्रकाराच्या वैशिष्ट्यानुरूप अध्यापकाने मांडावे. संत साहित्यातील प्राधान्याने भक्तिरस, पंडितीकाव्यातील संस्कृतप्रचुरता, शाहिरी वाङ्मयातील वीरश्री ही वाङ्मयाची वैशिष्टे ठरतात.

**समारोप**

वाङ्मय व त्याची सांस्कृतिक परिस्थिती यातील जैवसंबंधाबददलची आणि वाङ्मयातील सौंदर्याबददलची आपली धारणा विशुध्द आणि नेटकी असावी लागते. अशा नेटक्या कलादृष्टीतून झालेल्या प्राचीन मराठी वाङ्मयाच्या सांस्कृतिक परिस्थितीच्या अभ्यासाचे अध्ययन अध्यापन करणे योग्य ठरेल. प्राचीन मराठी वाङ्मयाच्या परंपरा प्रेरणा यांचा अभ्यास अध्ययन अध्यापनासाठी एका दृष्टीने आवश्यक आहे असे वाटते. प्राचीन मराठी वाङ्मयाचे स्वरूप घडविण्यात त्यांच्या परंपरानी आणि प्रेरक ठरलेल्या प्रवृत्तीनी फार मोठा हातभार लावलेला आहे म्हणून विशेष करून प्राचीन मराठी वाङ्मयाच्या स्वरूपाच्या आकलन सुलभतेसाठी त्याच्या परंपरा प्रेरणाचा अभ्यास होण्याची नितांत गरज आहे. पुराणसदृश्य साहित्याच्या निर्मितीची प्रेरणा बखरकारांना लेखन प्रवृत्त करीत होती असे दाखवून देण्यात आलेले आहे.

थोडक्यात, प्राचीन व मध्ययुगीन वाङमयातील भाषिक वैशिष्टये, स्थल—काल—नाम—निश्चितीचे प्रश्न, संप्रदायाची तत्वज्ञाने व आचारधर्म यांचे स्वरूप, व्यापक सांस्कृतिक पार्श्वभूमी आणि परंपरा — प्रेरणा यांचे अध्ययन अध्यापन हे त्यांचा प्राचीन वाङमयाच्या कलात्मक रूपाशी असलेला जैव संबंध उलगडून दाखविणारे असावे, असे म्हणता येईल.

**संदर्भ ग्रंथ सूची**

१. साहित्य अध्यापन आणि प्रकार — श्री.पु. भागवत, सुधीर रसाळ व इतर, प्रकाशक मौज प्रकाशन गृह, मुंबई
२. प्रबोधनाचे प्रवक्ते — प्रा. गं. बा. सरदार प्रकाशक गोखले एज्युकेशन सोसायटी नाशिक
३. संत वाङ्मयाची सामाजिक फलश्रुती — प्रा. गं. बा. सरदार, प्रकाशक : लोकवाङ्मय गृह
४. प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास — ल. रा. नसिराबादकर, प्रकाशक फडके प्रकाशन कोल्हापूर
५. प्राचीन मराठी गद्य : प्रेरणा आणि परंपरा — डॉ. श्री. रं. कुलकर्णी